# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जनसंपर्क कक्ष

**रविवार, दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी**

**प्रसिद्ध झालेल्या वार्ता**

**दै. लोकमत**

# गवळी, डिसोजा यांची कविता मानवी मूल्यांची बूज राखणारी : डॉ. माया पंडित

## विद्यापीठात काळसेकर काव्य पुरस्काराने सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कवी अरुणचंद्र गवळी आणि फेलिक्स डिसोजा यांची कविता मानवी मूल्यांची बूज राखणारी आहे. अशा कवींना पुरस्कार देऊन शिवाजी विद्यापीठाने त्यांचा केलेला सन्मान हे स्वागतार्ह आहे, असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. माया पंडित यांनी केले.

गणित विभागाच्या सभागृहात शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे शनिवारी ज्येष्ठ कवी अरुणचंद्र गवळी (पुणे) यांना सतीश काळसेकर आणि युवा कवी फेलिक्स डिसोजा (वसई) यांना ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. .

यावेळी गवळी आणि डिसोजा यांच्यासह परीक्षक कवी अजय कांडर यांनीही मनोगत व्यक्त केले. गणेश विसपुते यांनी नीळकंठ कदम यांची काळसेकरांविषयीची कविता सादर केली. आदित्य काळसेकर यांनी विद्यापीठाशी जडलेला ऋणानुबंध कायम जपण्याची ग्वाही दिली. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी उदय नारकर, सायमन मार्टिन, प्राचार्य डॉ. अनिल गवळी, चंद्रकांत बाबर, जयसिंग पाटील उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाचे काळसेकर पुरस्कार शनिवारी कवी अरुणचंद्र गवळी आणि फेलिक्स डिसोजा यांना डॉ. माया पंडित व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले.

**दै. पुढारी**

# मानवी मूल्यांची बूज राखणाऱ्या कवींचा सन्मान स्वागतार्ह

## डॉ. माया पंडित; शिवाजी विद्यापीठात काळसेकर पुरस्कारांचे वितरण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कवी अरुणचंद्र गवळी व फेलिक्स डिसोजा यांची कविता मानवी मूल्यांची बूज राखणारी आहे. अशा कवींना पुरस्कार देऊन शिवाजी विद्यापीठाने त्यांचा केलेला सन्मान ही स्वागतार्ह बाब आहे, असे प्रतिपादन साहित्यिक, अनुवादक डॉ. माया पंडित यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्या वतीने ज्येष्ठ कवी अरुणचंद्र गवळी (पुणे) व युवा कवी फेलिक्स डिसोजा (वसई) यांना अनुक्रमे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार व ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. डॉ. पंडित म्हणाल्या, गवळी यांची कविता ही वास्तवाची चिरफाड करून चहूबाजूंनी त्याचे तुकडे भिरकावून टाकणारी, वास्तवाचे विरूप उघडेवाघडे करून दाखवणारी आहे. डिसोजा यांच्या कवितेमध्ये कथात्म अंगाने अनेक प्रकारची निवेदने, दर्शने सामोरे येत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे काळसेकर पुरस्कार कवी अरुणचंद्र गवळी व फेलिक्स डिसोजा यांना डॉ. माया पंडित, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. समवेत आदित्य काळसेकर, डॉ. रणधीर शिंदे, कवी अजय कांडर आदी. .(छाया : अर्जुन टाकळकर)

मूल्यांच्या संघर्षाची कथा आणि व्यथा ते उलगडण्याचा प्रयत्न करतात. गवळी म्हणाले, संकटाला हार न जाणारी आणि पर्यायी समतावादी व्यवस्थेची उभारणी करण्याची प्रेरणा कवीने आणि त्याच्या कवितेने देत राहिले पाहिजे. डिसोजा म्हणाले, सध्याचा स्थित्यंतराचा काळ धक्का देणारा आहे. यामध्ये सुरू असलेल्या मूल्यांच्या घुसळणीचा वेध घेण्यासाठी कवीने अखंड चिकित्सक बुद्धीने काम करीत राहिले पाहिजे.

यावेळी परीक्षक कवी अजय

करण्यामागील भूमिका स्पष्ट केली. गणेश विसपुते यांनी निळकंठ कदम यांची सतीश काळसेकरांविषयीची कविता सादर केली. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी उदय नारकर, सायमन मार्टिन, प्राचार्य डॉ. अनिल गवळी, चंद्रकांत बाबर, जयसिंग पाटील, काळसेकर कुटुंबीय यांच्यासह संशोधक, शिक्षक उपस्थित होते.

**दै. सकाळ**



# गवळी, डिसोजांची कविता मूल्यांची बूज राखणारी

## डॉ. माया पंडित : शिवाजी विद्यापीठात काळसेकर पुरस्कारांचे वितरण

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १५ : 'अरुणचंद्र गवळी व फेलिक्स डिसोजा यांची कविता मानवी मूल्यांची बूज राखणारी आहे. अशा कवींना पुरस्कार देऊन शिवाजी विद्यापीठाने त्यांचा केलेला सन्मान ही स्वागतार्ह बाब आहे,' असे प्रतिपादन साहित्यिक, अनुवादक प्रा. डॉ. माया पंडित यांनी केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे ज्येष्ठ कवी अरुणचंद्र गवळी (पुणे), कवी फेलिक्स डिसोजा (वसई) यांना अनुक्रमे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार, ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार प्रदान केला. गणित अधिविभाग सभागृहात कार्यक्रम झाला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पंडित म्हणाल्या, 'गवळी यांची कविता ही वास्तवाची चिरफाड करून चहूबाजूंनी त्याचे तुकडे भिरकावून टाकणारी आणि वास्तवाचे स्वरूप उघडेवाघडे करून दाखवणारी आहे. फेलिक्स डिसोजा यांच्या कवितेमध्ये कथात्म अंगाने अनेक प्रकारची निवेदने, दर्शने सामोरी येत राहतात. त्याप्रमाणे संस्कृती आणि मूल्यांच्या संघर्षाची कथा, व्यथा ते उलगडण्याचा प्रयत्न करतात.'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे काळसेकर पुरस्कार कवी अरुणचंद्र गवळी आणि फेलिक्स डिसोजा यांना डॉ. माया पंडित, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते प्रदान केले. शेजारी डावीकडून आदित्य काळसेकर, डॉ. रणधीर शिंदे, अजय कांडर.

अरुणचंद्र गवळी म्हणाले, 'सतीश काळसेकर यांच्यामुळेच माझा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. एका चांगल्या मित्राच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार स्वीकारत असताना मनामध्ये अव्यक्त भावनांचा कल्लोळ माजला आहे. मानवी सभ्यतेवर हल्ले, द्वेष आणि विखार याविरुद्ध आवाज उठवण्याची क्षमता कवीमध्येच असते.' कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, 'या दोन्ही कवींची कविता ही विषमतेवर नेमकेपणाने बोट ठेवणारी आहे. त्यांची कविता ही गाणे न वाटता सर्वसामान्यांचे जगणे वाटते, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.'

यावेळी परीक्षक कवी अजय कांडर यांनी भूमिका स्पष्ट केली. गणेश विसपुते यांनी निळकंठ कदम यांची काळसेकरांविषयीची कविता सादर केली. आदित्य काळसेकर यांनी शिवाजी विद्यापीठाशी काळसेकर कुटुंबीयांचा जडलेला ऋणानुबंध कायम जपण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही दिली.

मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी उदय नारकर, सायमन मार्टिन, प्राचार्य डॉ. अनिल गवळी, चंद्रकांत बाबर, जयसिंग पाटील, काळसेकर कुटुंबीय, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

### सध्याचा स्थित्यंतराचा काळ धक्का देणारा

■ कवी फेलिक्स डिसोजा म्हणाले, 'या पुरस्कारामुळे काळसेकरांचा आशीर्वादाचा हात पाठीवर असल्याचा भास मला होत आहे. माझी कविता म्हणजे भाषेच्या किनाऱ्यावर थांबून स्वतःलाच शोधण्याचा एक प्रयत्न आहे. सध्याचा स्थित्यंतराचा काळ धक्का देणारा आहे.'

दै. **पुण्यनगरी**

# गवळी, डिसोजांची कविता मानवी मूल्यांची बुज राखणारी

## डॉ. माया पंडित; विद्यापीठात काळसेकर पुरस्कारांचे वितरण



**कोल्हापूर : कवी अरुणचंद्र गवळी व फेलिक्स डिसोजा यांना पुरस्कार प्रदान करताना डॉ. माया पंडित, कुलसचिव डॉ. विलास शिंदे.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कवी अरुणचंद्र गवळी आणि फेलिक्स डिसोजा यांची कविता मानवी मूल्यांची बुज राखणारी आहे. अशा कवींना पुरस्कार देऊन शिवाजी विद्यापीठाने त्यांचा केलेला सन्मान ही स्वागतार्ह बाब आहे, असे प्रतिपादन साहित्यिक, अनुवादक डॉ. माया पंडित यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे ज्येष्ठ कवी अरुणचंद्र गवळी (पुणे) आणि युवा कवी फेलिक्स डिसोजा (वसई) यांना अनुक्रमे सतीश काळसेकर, ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. गणित अधिविभाग सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

यावेळी अरुणचंद्र गवळी म्हणाले, सतीश काळसेकर यांच्यामुळेच माझा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. फेलिक्स डिसोजा म्हणाले, या पुरस्कारामुळे काळसेकरांचा आशीर्वादाचा हात पाठीवर असल्याचा भास मला होत आहे. माझी कविता म्हणजे भाषेच्या किनाऱ्यावर थांबून स्वतःलाच शोधण्याचा एक प्रयत्न आहे. अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, या दोन्ही कवींची कविता ही विषमतेवर नेमकेपणाने बोट ठेवणारी आहे. यावेळी परीक्षक कवी अजय कांडर यांनीही गवळी आणि डिसोजा यांची पुरस्कारासाठी निवड करण्यामागील भूमिका स्पष्ट केली. गणेश विसपुते यांनी नीळकंठ कदम यांची सतीश काळसेकरांविषयीची कविता सादर केली. आदित्य काळसेकर यांनी शिवाजी विद्यापीठाशी काळसेकर कुटुंबीयांचा जडलेला ऋणानुबंध कायम जपण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही दिली. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक, प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन, तर सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमास उदय नारकर, सायमन मार्टिन, प्राचार्य डॉ. अनिल गवळी, चंद्रकांत बाबर, जयसिंग पाटील, काळसेकर कुटुंबीय आदी उपस्थित होते.

**दै. पुढारी**

# ग्रामीण महिलांना सक्षमीकरणाच्या संधी प्रदान करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील

## प्र-कुलगुरू डॉ. जाधव : 'स्वरोजगारातून सक्षमीकरण' कार्यशाळेस प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ग्रामीण भागातील महिलांमध्ये विविध कष्टाची आणि कौशल्याची कामे करण्याची प्रचंड क्षमता असते. त्यांना सक्षमीकरणाच्या योग्य संधी प्रदान करण्याची आवश्यकता असते. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाची यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशाळा, बेटी बचाव अभियान आणि कोल्हापूर जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्वरोजगारातून सक्षमीकरण' या दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू झालेल्या दोनदिवसीय कार्यशाळेस उपस्थित महिलांसमवेत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, प्रशिक्षक, शिक्षक.**

ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणाबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. रोटरी क्लब ऑफ एक्झिक्युटिव्ह, इचलकरंजी यांच्या सहयोगाने विविध प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले आहे.

कार्यशाळेत जिल्हा परिषदेचे जिल्हा अभियान व्यवस्थापक दयानंद पाटील, इचलकरंजी रोटरीचे सहायक गव्हर्नर गिरीश कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. प्रशाळेचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. उर्मिला दशवंत यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, बेटी बचाव अभियान समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई, रोटरीचे अध्यक्ष संतोष साधळे, सचिव मयूर पाटील आणि प्रोजेक्ट चेअरमन शीतल उपाध्ये यांच्यासह जिल्ह्यातील विविध स्वयंसहायता बचत गटाच्या महिला, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

**दै. पुण्यनगरी**

# ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी विद्यापीठ प्रयत्नशील : प्र-कुलगुरू जाधव

**कोल्हापूर :** ग्रामीण भागातील महिलांमध्ये कष्टाची व कौशल्याची कामे करण्याची प्रचंड क्षमता असते. त्यांना सक्षमीकरणाच्या योग्य संधी प्रदान करण्याची गरज असते. त्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाची यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशाळा, बेटी बचाओ अभियान आणि कोल्हापूर जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्वरोजगारातून सक्षमीकरण' या दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. रोटरी क्लब ऑफ एक्झिक्युटिव्ह, इचलकरंजी यांच्या सहयोगाने विविध प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले आहे.

कार्यशाळेत जि. प.चे जिल्हा अभियान व्यवस्थापक दयानंद पाटील, इचलकरंजी रोटरीचे सहायक गव्हर्नर गिरीश कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. प्रशाळेचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. ऊर्मिला दशवंत यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रतिभा देसाई, रोटरीचे अध्यक्ष संतोष साधळे, मयूर पाटील, शीतल उपाध्ये यांच्यासह बचत गटांच्या महिला, विद्यार्थी उपस्थित होते.

**दै. पुढारी**

# विद्यापीठ मास कम्युनिकेशन विभागातर्फे आज प्रशांत नाकवे यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ मास कम्युनिकेशन विभाग आणि युनाते क्रिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १६) सायंकाळी ४ वाजता शाहू स्मारक भवन येथे ख्यातनाम फोटो जर्नालिस्ट प्रशांत नाकवे यांचे 'फोटो जर्नालिझम आणि एआयचे आव्हान' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. यावेळी रा. शि. गोसावी कलानिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य मनोज दरेकर, ज्येष्ठ छायाचित्रकार रघू जाधव, अस्मिता जाधव, छायापत्रकार राहुल गायकवाड उपस्थित राहणार आहेत. यावेळी नाकवे यांनी संपूर्ण एआय तंत्रज्ञान वापरून तयार केलेल्या शॉर्टफिल्मचे स्क्रिनिंग करण्यात येणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव व शुभम चेचर यांनी केले आहे.

**दै. लोकमत**




शिवाजी विद्यापीठात छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामार्फत शनिवारी बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली.

# विद्यापीठात बिरसा मुंडा जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामार्फत शनिवारी बिरसा मुंडा यांची १५०वी जयंती साजरी करण्यात आली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते प्रशासकीय भवन इमारतीमध्ये बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपकुलसचिव गजानन पळसे, आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या सहायक संचालक डॉ. नीलांबरी जगताप, इतिहास अधिविभागाचे डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट उपस्थित होते.

दै. पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात बिरसा मुंडा जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामार्फत शनिवारी बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती साजरी करण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते प्रशासकीय भवन इमारतीमध्ये बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपकुलसचिव गजानन पळसे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट आदी उपस्थित होते.

**दै. पुढारी**

# विद्यापीठ हिवाळी सत्रातील परीक्षेला ३९ हजार ९३४ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर - नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षेला शनिवारी ३९ हजार ९३४ विद्यार्थी उपस्थित होते. ४७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध १८७ केंद्रावर झाल्या.

भरारी पथकाकडून कोल्हापूर (१२), सांगली (४) व सातारा (१) अशा एकूण १७ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

**दै. लोकमत**

# क्विक Shorts

## परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या १७ जणांना पकडले..

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या कोल्हापुरातील १२, सांगलीतील ४ आणि साताऱ्यातील १ अशा एकूण १७ कॉपीबहाद्दरांना शनिवारी परीक्षा प्रमाद समितीने प्रत्यक्ष पकडले. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्यांवर नियंत्रणासाठी विद्यापीठाने नेमलेल्या भरारी पथकाने पकडलेल्या या विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांना दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

**दै. सकाळ**

# डीकेएएससी कॉलेजचे यश

## आंतरविभागीय ॲथलेटिक्स, वेटलिफ्टिंगमध्ये चार पदके

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. १५ : न्यू कॉलेज, कोल्हापूर यांच्या विद्यमाने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आंतरविभागीय मैदानी स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत यश प्राप्त केले.

यामध्ये समीक्षा आडसुळे हिने १.४५ मीटर इतकी उंच उडी टाकत सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. प्रतीक्षा आडसुळे हिने १.४० मीटर इतकी उंच उडी मारत रौप्यपदक पटकावले. हातोडाफेक प्रकारात सौरभ दंडवते याने ४० मीटर लांब हातोडा फेकत कांस्यपदक पटकावले. तसेच देवचंद कॉलेज अर्जुननगर यांच्या विद्यमाने झालेल्या आंतरविभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत क्रिश मोरे याने १६० किलो स्नॅच आणि १४० किलो क्लिन ॲण्ड जर्क असे एकूण ३०० किलो इतके वजन उचलून रौप्यपदक पटकावले. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, प्रबंधक आर. बी. जोग यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडूंनी आंतरविभागीय ॲथलेटिक्स व वेटलिफ्टिंग स्पर्धेत यश मिळवले.